ठाणेवैभव

# सायबर सुरक्षा क्षेत्रात उल्लेखनीय यश

## प्रगती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची क्विक हिल फाउंडेशनच्या विशेष प्रशिक्षण सत्रासाठी निवड




**डोंबिवली :** शहरातील ठाणे जिल्हा आगरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रगती महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले असून पुण्यातील नामांकित क्विक हिल फाउंडेशनच्या विशेष प्रशिक्षण सत्रासाठी त्यांची निवड झाली आहे.

नुकत्याच पुण्यात झालेल्या या प्रशिक्षणात देशभरातून निवडक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग होता. क्विक हिल फाउंडेशनच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा मोहिमेसाठी नवीन क्लब ऑफिसर्सची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित क्लब ऑफिसर्समध्ये श्रुती साहू (प्रेसिडेंट), आदर्श उपाध्याय (सेक्रेटरी), अंजली दाभोळकर (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर) आणि गायत्री गन्नौरे (मीडिया डायरेक्टर) यांचा समावेश आहे. हे सर्वजण शिक्षक समन्वयक रुपाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करतील. या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा, सोशल मीडिया फ्रॉड, डिजिटल आयडेंटिटी संरक्षण, डेटा प्रायव्हसी यासारख्या अत्याधुनिक विषयांवर सखोल प्रशिक्षण घेतले. या सत्रात तंत्रज्ञानाशी निगडित वास्तवातील समस्या, ऑनलाइन सुरक्षेची आवश्यकता आणि भविष्यातील सायबर धोके यावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन झाले.

या कार्यक्रमात क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. 2025 - 26 शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाने क्विक हिल फाउंडेशनशी सामंजस्य करार केला असून या मोहिमेअंतर्गत कार्यशाळा, परिसंवाद आणि जागरुकता मोहिमांचे आयोजन केले जाईल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय वानखेडे यांनी पुढील नियोजित जागरुकता अभियानाकरिता शुभेच्छा दिल्या.

Main Edition
Jun 18, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com